श्री. योगेश शिवराम बागडे आणि श्री. दिगंबर निवृत्ती चव्हाण

## -: निशाणी क्र. सी-७ वरील आदेश :-

### (दिनांक २७/०१/२०२६)

प्रस्तुतचा अर्ज प्रथम पक्षकार यांनी नि.क्र. सी-५ वरील आदेशाप्रमाणे दंडाची रक्कम न्यायालयात जमा करुन घेणेबाबत व त्यांच्या विरुध्द झालेला "पुरावा बंद" आदेश रद्द होण्याकरिता दाखल केलेला आहे. द्वितीय पक्षकाराने सदर अर्जावर म्हणणे दाखल केलेले नाही.

२. अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रस्तुतच्या संदर्भात यापूर्वी दिनांक १०/०७/२०१८ रोजी एकतर्फा निवाडा झालेला होता. त्यानंतर प्रथम पक्षकाराने किरकोळ अर्ज आय.डी.ए. क्रमांक ०१/२०१९ दाखल करुन सदर झालेला एकतर्फा निवाडा रद्दबातल करुन प्रकरण पुर्नफैलावर घेण्याची विनंती केली होती. सदर प्रकरणी दिनांक २०/०९/२०२४ रोजी आदेश होवून प्रकरण पुर्नफैलावर घेण्यात आले.

३. प्रकरण पुर्नफैलावर घेतल्यानंतर वारंवार संधी देवूनही प्रथम पक्षकाराने लेखी कैफियत न दाखल केल्यामुळे दिनांक १३/०६/२०२५ रोजीच्या नि.क्र. ओ-१ वरील आदेशान्वये प्रकरण प्रथम पक्षकार यांचेविरुध्द विना कैफियत चालले. त्यानंतर द्वितीय पक्षकाराने दिनांक ११/०७/२०२५ रोजी त्याचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले. त्याच दिवशी प्रथम पक्षकार यांनी नि.क्र. सी-४ वर अर्ज दाखल करुन त्यांच्या विरुध्द झालेला "कैफियत नाही" चा आदेश रद्द करण्याची विनंती केली असता सदर अर्ज रुपये ५००/- दंड म्हणून द्वितीय पक्षकारास अदा करण्याच्या अटीवर दिनांक ०१/०८/२०२५ रोजी मंजूर करण्यात आला. असे दिसून येते की, प्रथम पक्षकार यांनी सदर आदेशाची पुर्तता वेळेत केली नाही. त्यामुळे प्रकरण पुढे जावून दिनांक ०९/०९/२०२५ रोजी प्रथम पक्षकार यांच्या विरुध्द "उलटतपास नाही" चा आदेश पारीत करण्यात आला व त्याच दिवशी द्वितीय पक्षकाराने नि.क्र. यु-९ पुरावा बंद पुरशीस दाखल केली. त्यानंतर दिनांक १६/०९/२०२५ रोजी प्रथम पक्षकार यांनी नि.क्र. सी-५ अर्ज दाखल करुन त्यांच्या विरुध्द झालेला "उलटतपास नाही" चा आदेश रद्द करणेबाबत व दंडाची रक्कम भरुन घेणेबाबत कोर्ट अधीक्षक यांना आदेश होण्याची विनंती

केली. सदरच्या अर्जावर प्रथम पक्षकार यांनी दंडाची रक्कम न्यायालयात जमा करावी व ती पुर्तता केल्याशिवाय "उलटतपास नाही" चा आदेश रद्द करणेबाबतच्या विनंतीचा विचार करता येणार नाही, असे आदेश दिनांक ०१/१०/२०२५ रोजी पारीत करण्यात आले. त्यानंतरही प्रथम पक्षकार यांनी नि.क्र. सी–५ वरील आदेशाची पुर्तता केली नाही. त्यामुळे दिनांक १९/१२/२०२५ रोजीच्या नि.क्र. ओ–१ वरील आदेशान्वये प्रस्तुतचे प्रकरण अंतिम युक्तिवादाकरिता नेमण्यात आले. दिनांक २९/१२/२०२५ रोजी द्वितीय पक्षकार यांचा युक्तिवाद ऐकला व त्याच दिवशी नि.क्र. सी–६ वर प्रथम पक्षकार यांनी लेखी युक्तिवाद दाखल केला व प्रकरण द्वितीय पक्षकाराच्या प्रत्युत्तर युक्तिवादाकरिता नेमले असता प्रथम पक्षकार यांनी प्रस्तुतचा अर्ज नि.क्र. सी–५ वरील आदेशाप्रमाणे दंडाची रक्कम न्यायालयात जमा करुन घेणेबाबत व त्यांच्या विरुध्द झालेला "पुरावा बंद" आदेश रद्द होण्याकरिता दाखल केलेला आहे.

४. प्रस्तुतच्या अर्जास द्वितीय पक्षकार अथवा त्याचे युनियन प्रतिनिधी यांनी आजपर्यंत म्हणणे दाखल केलेले नाही. प्रस्तुतचे प्रकरण हे सन २०१५ चे जुने असल्याने द्वितीय पक्षकाराच्या म्हणण्याशिवाय सदरचा अर्ज निकाली काढणे आवश्यक आहे. प्रथम पक्षकार यांची कामाची पध्दत पाहता असे दिसून येते की, त्यांना वारंवार संधी देवूनही न्यायालयाच्या आदेशाची पुर्तता त्यांनी केलेली नाही. तसेच प्रस्तुतच्या अर्जामध्ये या न्यायालयाने नि.क्र. सी–५ वर "पुढील तारखेपर्यंत रक्कम जमा करावी व ती रक्कम जमा न केल्यास प्रथम पक्षकार यांना पुराव्याच्या संधी उपलब्ध होणार नाही असा आदेश केला आहे" असे नमूद केलेले आहे. परंतु प्रथम पक्षकार यांच्या पुराव्याबाबत नि.क्र. सी–५ वर कोणतेही आदेश पारीत झालेले नाहीत. तसेच प्रकरण पुर्नफैलावर घेतल्यानंतरही पुरावा बंदचा आदेश प्रथम पक्षकार यांच्या विरुध्द झालेला नाही. असे असताना मूळ संदर्भाचे कामी त्यांच्या विरुध्द झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द होण्याची विनंती प्रथम पक्षकार यांनी प्रस्तुतच्या अर्जात केलेली आहे. यावरुन हे स्पष्ट होत आहे की, प्रथम पक्षकार हे प्रकरण चालविण्यास मुद्दामहून उशीर करत आहेत. प्रथम पक्षकार यांनी त्यांचा लेखी अंतिम युक्तिवाद नि.क्र. सी–६ वर दाखल केलेला असतानाही पुन्हा त्यांना संधी मिळावी म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. असे असताना प्रस्तुतचे प्रकरण गुणदोषावर चालण्याच्या उद्देशाने प्रथम पक्षकार यांची लेखी कैफियत अभिलेखावर असणे आवश्यक असून त्यांनी प्रस्तुत अर्जात केलेल्या विनंतीचा विचार करता नि.क्र. सी–५ वरील आदेशाची पुर्तता प्रथम पक्षकार

यांनी करणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज द्वितीय पक्षकारास झालेल्या गैरसोयाचा विचार करता दंडासहित मंजूर करणे योग्य व न्यायोचित ठरेल. करिता आदेश :-

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रुपये ४,०००/- दंड म्हणून प्रथम पक्षकार यांनी द्वितीय पक्षकारास देण्याच्या अटीवर अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रथम पक्षकार यांनी नि.क्र. सी-५ व प्रस्तुतचा अर्ज नि.क्र. सी-७ वरील दोन्ही आदेशांची पुर्तता आज अथवा पुढील तारखेपूर्वी करावी.

३. प्रथम पक्षकार यांनी दंडाची रक्कम द्वितीय पक्षकार यांना अदा करण्याकरिता या न्यायालयात जमा करावी.

४. प्रथम पक्षकाराने आदेशांची पुर्तता विहित कालावधीत न केल्यास प्रकरण अंतिम न्यायनिर्णयाकरिता नेमले जाईल.

५. प्रस्तुतचे प्रकरण पुर्नफैलावर घेतल्यानंतर प्रथम पक्षकार यांचेविरुध्द पुरावा बंदचा आदेश न झाल्याने त्याबाबत त्यांनी केलेली विनंती नामंजूर करण्यात येत आहे.

MADHURA ABASAHEB MULIK
Digitally signed by MADHURA ABASAHEB MULIK
Date: 2026.01.27 17:50:23 +0530

(मधुरा आ. मुळीक)
पिठासीन अधिकारी
कामगार न्यायालय क्र.१, कोल्हापूर.

ठिकाण – कोल्हापूर.
दिनांक – २७/०१/२०२६